# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई - ४०० ००१.

दूरध्वनी - २२६१७९६९ फॅक्स-२६९०००७

E-mail: desk18@dtemaharashtra.gov.in Internet : http://www.dtemaharashtra.gov.in


**संकेतस्थळ परिपत्रक**

क्र.१८/तंशिसं/दोषी.संस्था पत्र /२०१८/२२८

दि. ०८/०६/२०१८

प्रति,
सर्व संबंधित विद्यार्थी,

विषय :- **विशेष चौकशी पथकाने कारवाईसाठी शिफारस केलेल्या दोषी संस्थांना "राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना" व "डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना" या योजनेतून वगळण्याबाबत....**

संदर्भ :- उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे पत्र क्र. : संकीर्ण-२०१८/प्र.क्र.८८/तांशि-४, दि. १०/०५/२०१८.

शासनाने विविध शिष्यवृत्ती योजनांच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने विशेष चौकशी पथक नियुक्त केले. विशेष चौकशी पथकाने शासनाला सादर केलेल्या ७० दोषी संस्थांवर कारवाई करावयाच्या अहवालानुसार उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये या संचालनालयाच्या अखत्यारितील संस्थांना **"राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना"** व **"डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना"** योजनेतून वगळण्यात यावे असे निर्देश दिलेले आहेत.

तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारित खालीलप्रमाणे ०३ संस्था विशेष चौकशी पथकाच्या अहवालात समाविष्ट आहेत.

| अनु.क्र. | संस्थेचे नाव |
|---|---|
| १. | राजश्री शाहू महाराज पॉलिटेक्निक, किनवट, जि. नांदेड |
| २. | राजश्री शाहू तंत्रनिकेतन विद्यालय, कळंब, जि. उस्मानाबाद |
| ३. | व्ही.जे.शिंदे तंत्रनिकेतन व अभियांत्रिकी महाविद्यालय, वरुडा रोड,उस्मानाबाद |

उपरोक्त संस्थांना तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या **"राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना"** व **"डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना"** या योजनांतून वगळण्यात येत आहे. त्यामुळे सदर संस्थांतील विद्यार्थ्यांना या योजनांचा लाभ देय ठरणार नाही. संबंधित संस्थांमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी व पालकांनी याची नोंद घ्यावी.

(डॉ. अभय वाघ.)
संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय,मुंबई.

प्रत - **माहिती व पुढील उचित कार्यवाहीसाठी**

१) सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद.
२) प्राचार्य, राजश्री शाहू महाराज पॉलिटेक्निक, किनवट, जि. नांदेड.
३) प्राचार्य, राजश्री शाहू तंत्रनिकेतन विद्यालय, कळंब, जि. उस्मानाबाद.
४) प्राचार्य, व्ही.जे. शिंदे तंत्रनिकेतन व अभियांत्रिकी महाविद्यालय, वरुडा रोड, जि. उस्मानाबाद.
५) तंत्रशिक्षण संचालनालय मुख्य कार्यालय, कार्यासन क्र. २, २ अ, ३ व १०